ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-VI JUNE 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारत व प्रचलित आर्थिक समस्या

**श्री.बिडवे बाळासाहेब नागोराव**

प्राचार्य, यमुनाबाई गोरे अध्यापक

विद्यालय, मुरुड ता.जि. लातूर

## प्रास्ताविक

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नियोजनातून आर्थिक विकास साध्य करण्याचे निश्चित करण्यात आले. ब्रिटीश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचे झालेले मोठया प्रमाणावरील शोषण आणि कुटीर व लघुउद्योगांचा झालेला ऱ्हास यामुळे देशाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले होते. रोजगार निर्मिती, दारिद्रय निर्मुलन, उद्योगांचा विकास करणे व त्यासाठी पायाभूत सोयींचा विकास करणे, शेतीचा विकास करणे अशी अनेक कामे सरकारपुढे होती ही सर्व कामे करण्यासाठी मोठया प्रमाणावर गुंतवणुकीची गरज होती व म्हणूनच आर्थिक नियोजनाचा मार्ग भारताने स्विकारला पंचवर्षिक योजनांची आखणी करुन ५ वर्षांच्या काळात राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे, दारिद्रय निर्मुलनाचे रोजगर निर्मितीचे अशी अनेक आर्थिक विकासाला पोषक ठरणारी उद्दिष्टये ठरविण्यात आली. शेती क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. आजपर्यंत राबविलेल्या विविध योजनांतून व विशेषतः पंचवार्षिक योजनातून आपल्या सर्व आर्थिक समस्या सुटल्या का? नसतील तर त्या कोणत्या? याचा अभ्यास करायचा आहे. भारताने अजपर्यंत १२ पंचवार्षिक योजना राबविल्या आहेत. परंतु तरीही आर्थिक प्रश्न व विकास बाकी आहे, याची जाणीव सरकारला आहे. म्हणूनच त्यांने कांही महत्त्वाचे निर्णय आता घेतले आहेत. भारतात नियोजनाचा मार्ग स्विकारुणही काही आर्थिक समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत. त्या समस्या पुढील प्रमाणे सागत येतील.

## १.लोकसंख्या प्रस्फोट

आर्थिक नियोजनाचा स्विकार करुन व आजपर्यंत १२ पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करुन देखील भारतातील वाढत्या लोकसंख्येची समस्या अद्याप सुटलेली नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे शेती उद्योग आणि सेवा व्यवसाय हयांच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतात. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीची फळे पुरेशा प्रमाणात लोकांना प्राप्त होत नाहीत. भारताची आजची लोकसंख्या १२० कोटी पेक्षा जास्त आहे. लोकसंख्येमध्ये चीनच्या नंतर आपला जगात दुसरा क्रमांक लागतो १९२१ नंतर भारतातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे अपाहयाने वाढत गेले जन्मदर वाढवला तर मृत्यूदर कमी झाला.

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने वैद्यकीय दृष्टीकोन विस्तार दृष्टीकोन व मुक्त निवड दृष्टीकोन स्विकारले पण पाहिजे त्या प्रमाणात स्त्रीचे दुय्यम स्थान, धार्मिक व पारंपारिक विचार मुले ही देवाची देणगी आहेत असे मानने, बालविवाह इ. कारणेही सांगता येतील. त्याचबरोबर चीन व जपान सारखी धोरणे जर लोकसंख्याबाबतीत सरकारणे राबवली तर लोकसंख्येला नक्कीच आळा बसेल.

## २.युध्दे

१९६२ मध्ये चीनकडून झालेल्या भारतीय हल्ल्यामुळे भारताला संरक्षणावरील खर्च एकदम वाढवावा लागला. तेवढयाच खर्चात शक्य असलेली विकासाची संधी गमवावी लागली. तिसऱ्या योजनेच्या साधनसंपत्तीवर भार पडला व्यवहार तोलात तूट निर्माण झाली अन्नधान्य व जीवनाश्यक वस्तूंच्या किमती ४८ टक्क्यांनी वाढल्या. संरक्षण खर्चाच्या वाढीतही भर पडली, परिणामी सरकारला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज काढावे लागले १९६५ व १९७१ मध्ये भारताचे पाकिस्तानशी युध्दे झाली. त्यामुळे पुन्हा संरक्षणावरील तरतुद व खर्च यांच्यात वाढ झाली. परिणामी संकल्पित आर्थिक विकास साधता आला नाही.

## ३.दारिद्र्य व बेरोजगारी

भारत सरकारने आजपर्यंत १२ पंचवार्षीक योजनांची अंमलबजावणी करुन व आर्थिक नियोजनाचा स्किवार करुन देखील भारतात दारिद्र्याचा प्रश्न अद्याप सोडविता आलेला नाही. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांना पुरेशे जीवनमान प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी पुरेशा प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार पुरवण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे, ग्रामीण भागात उद्योगांचा विकास

घडवूण आणणे आवश्यक आहे. भारतात दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांविषयी काही आकडेवारी सांगता येईल. ती पुढील प्रमाणे

### १.१ भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण

**(द.स. लक्षामध्ये)**

| | १९७९-८० | १९८४-८५ |
|---|---|---|
| ग्रामीण | २५९.६ | १६६.० |
| शहरी | ५७.२ | ४९.२ |
| एकूण | ३१६.० | २१५.२ |

१९८५ जर विचार केला तर भारतात ४८.४ टक्के लाक दारिद्रय रेषेखाली राहतात जर दारिद्रय कमी करायचे असेल तर लहान लोकसंख्येची गावे निर्माण करणे, लोकांना रोजगाराची साधणे पुरविणे इ. गोष्टी जर केल्या त दारिद्रय निर्मुलनास नक्कीच मदत होईल.

काम करण्याची इच्छा असून देखील काम न मिळालेल्या व्यक्तीस बेकार समजण्यात येते भारतात बेकारीच प्रमाण खूप मोठया प्रमाणावर आहे. बेकारी निर्मुलानासाठी सरकार राबवित असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक कार्यक्षमपणे होणे गरजेचे आहे. स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण व सहाय्य पुरविणे गरजेचे आहे. शिक्षणात तांत्रिक व रोजगाराभिमुख शिक्षणाचा समावेश करणे, श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे, ग्रामीण भागात लघु व कुटीरउद्योगाचा विकास करणे अशा उत्पादकांना अल्प दरात वाहतुक, गोदामांची सुविधा इ. जर उपलब्ध करून दिले तर सरकारवरील भार कमी होईल व बेरोजगार ही वाढण्यास मदत होईल.

## ४.शेती व उदयोगांचा असमान विकास

आर्थिक विकासाची प्रक्रिया औद्योगिकीकरण्याच्या प्रक्रियेतून सुरु केल्याने शेती विकासाकडे मोठया प्रमाणावर दुर्लक्ष झाले. शेती विकासाकडे दुर्लक्ष झाल्याने ग्रामीण भाग विकास प्रक्रियेपासून दूर राहिला.

याउलट शहरी भागात उद्योगांच्या स्थापनेमुळे तो विकास शहरी भागात उदयोगांच्या स्थापनेमुळे तो विकास प्रक्रियेत आघाडीवर राहिलेला आहे. शहरात रोजगाराच्या उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील लोकांनी शहारात स्थलांतर केले. भारतात १९९१ च्या आकडेवारीनुसार २३१.९० द.ल. लोक शहरी भागात राहतात. त्यापैकी ६० टक्के लोकसंख्या ही २१६ मोठया शहरात एकवटलेली आहे. त्यामुळे लोकसंख्येची घनतादेखील वाढलेली आहे. १९५१ मध्ये भारताच्या लोकसंख्येची घनता ११७ व्यक्ती होती. ती १९९१ मध्ये २२३ व्यक्ती इतकी झाली, तर २०११ मध्ये ३७२ व्यक्ती इतकी झाली. मुंबई, दिल्ली सारख्या शहरात तर लोकसंख्येची घनता ३००० व्यक्ती इतकी प्रचंड आहे. परिणामी शहरी भागात अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. यामुळे ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी पैसा कसा उभरावा ही समस्या सरकारला भेडसावते. म्हणून उदयोगांचा समतोल असणे आवश्यक आहे.

## ५.जीवनाश्यक वस्तूंचा तुटवडा

ग्रामीण भागात शेती अद्यापही निर्वाहाचे एक साधन म्हणून करण्यात येते. भारतात शेतीचे धारण क्षेत्र लहान असल्याने त्यातुन पुरेशी उत्पादन वाढ होउ शकत नाही. शेतीवर अवलंबुन असणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठे असल्याने एकूण उत्पादनाचा बराच मोठा भाग शेतकरी  व त्यांच्या कुटूंबावर खर्च होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न व शेतीतील गुंतवणुकीचे प्रमाण अल्प राहते.

लोकसंख्येच्या नागरीकरणामुळे अन्नधान्य, भाजीपाला, फळे इ. शेतमालाची मागणी मोठया प्रमाणावर वाढत आहे. शतमालाच्या आयात निर्यातीचा विचार करता निर्यातीचे पारडे अधिक जड होण्यासाठी आयात कमी करणे व त्यासाठी शेती विकास घडवुन आणण्यासाठी अधिक परिणामकारक प्रयत्न करणे गरजेचे आहे. अर्थात केवळ शेती विकास साध्य करणे एवढाच उपाय पुरेसा नसून वाढत्या लोकसंख्येला आळा घालणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## ६.आर्थिक विषमता

देशात निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय वाटप होणे आवश्यक आहे. अन्यथा समाजातील एका  वर्गाकडे उत्पन्नातल मोठा हिस्सा एकवटलेला व दुसऱ्या वर्गाकडे उत्पन्नातील मोठा हिस्सा एकवटलेला व दुसऱ्या  वर्गाकडे मात्र अत्यंत अल्प अशी स्थिती निर्माण होते, गरीब वर्गाच्या पुरेशा किमान गरजा देखील पुर्ण होऊ

शकत नाहीत. तर वरचा वर्ग आपल्या चैनीच्या व दिखाऊ उपभोग खर्चात दुर्मिळ साधन सामुग्रीचा अपव्यय करतो. भारतात विषमता कशा स्वरुपाची आहे. याची माहिती दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे

**१.२ भारतातील आर्थिक विषमता**

| अ.क्र. | कुटूंबाचे प्रमाण | कुटूंबजवळ असणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | १९७५ | १९८३ | २०११ |
| १ | तळाचे २० टक्के | ०७.० | ८.१ | **०४.२** |
| २ | दुसऱ्या क्रमांकाचे २० टक्के | ०९.२ | १२.३ | **१७.३** |
| ३ | तिसऱ्या क्रमांकाचे २० टक्के | १३.९ | १६.३ | **२१.५** |
| ४ | चौथ्या क्रमांकाचे २० टक्के | २०.५ | २२.० | **२८.०** |
| ५ | सर्वेच्च उत्पन्न गटातील २० टक्के | ४९.४ | ४१.० | २९.० |

## ७.शेतीची अल्प उत्पादकता

भारत जरी शेतीप्रमाधान देश असला, तरी शेतीची उत्पादकता अल्प आहे. जामिनीचा लहान आकार, शेतकऱ्याचे अज्ञान व दारिद्रय शेतीवर अवलंबुन असणारी कुटूंबातील मोठी सदस्य संख्या, ग्रामीण भागात शेतीशिवाय अन्य व्यवसाय उपलब्ध नसणे, शेतीचे विभाजन ३० कारणे शेतीच्या अल्पउत्पादकतेस जबाबदार आहेत. लोकसंख्येला आळा घालणे, ग्रामीण भागात शेतीशिवाय अन्य व्यवसायाचा जसे लघु व कुटीरउदयोगांचा विकास करणे, ग्रामीण लोकांची मनोवृत्ती बदलवणे , वाहतुकीच्या सोयी उपलब्ध करुन देणे इ. उपाय शेतीच्या उत्पादन वाढीसाठी सांगता येतील.

## ८.मानवी साधन संपत्तीचा अपुरा वापर

मानवी साधन संपत्तीच्या अंगी असणारे गुण ओळखुन, त्यांचा विकास करुन ही उपलब्ध साधन संपत्ती आर्थिक विकासासाठी योग्यरित्या, वापरता येऊ शकते. देशाला आवश्यक असणारे उदयोग, तंत्रज्ञान, उत्पान हयांचा विचार करुन मानवी साधनसंपत्तीला अशा तऱ्हेचे शिक्षण व प्रशिक्षण दयावे की, जेणेकरुन त्यांची

मागणी व पुरवण्यात मेळ राहील. भारतात जलद औद्योगिकीकरणासाठी, शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी, रोजगारासाठी सरकारवर अवलंबुन राहण्याची लोकांची प्रवृत्ती दूर करण्यासाठी, स्वयंरोजगाराचा प्रसार व विकास करण्यासाठी, शिक्षण प्रशिक्षण आपल्या गरजेनुसार पुरविणे आवश्यक आहे. त्याबरोबरच हया सर्व मानवी साधनसंपत्तीचा सामाऊन घेऊ शकेल अशाप्रकारे औद्योगिक व शेतीचा प्रगतीचा दर राखणेही आवश्यक आहे.

## ९.अंतर्गत व बाहय कर्जे

अंतर्गत कर्ज हे देशाािल व्यक्ती , वित्तीय संस्था, खुल्या बाजारातील रोखे, ट्रेझरी बील, या आधारावर मिळते. हे कर्ज सरकारच्या वतीने मध्यवर्ती बँक उभारते. मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, कल्याणकारी राज्याची संकल्पना,सार्वजनिक क्षेत्र, लोकपयोगी कल्याणकारी योजना अशा विविध कारणांनी भारताचे अंतर्गत व बाहय अशा दोन्ही प्रकारच्या कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते.

१९५०-५१ ते २०११-१२ या काळात भारत सरकारचे अंतर्गत कर्ज १०० पटीने वाढले. कर्जावरील व्याजच्या परतफेडीसाठीही सरकारला नवीन कर्जे उभरावी लागली.

बाहय कर्जाबाबतही वाढ झाल्याचे आढळुन येते. बाहय कर्ज हे बाहय देश, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, जसे आंतरराष्ट्रीय नाणे निधी आशिया विकस बँक, यासारख्या संस्थाकडून उभाले जाते.

## १०.तुटीचा अर्थभरणा

सरकारचे उत्पन्न आणि खर्च यात निर्माण होणाऱ्या तुटीतून तुटीच्या अर्थ भरण्याचा जन्म झाला अशी तुट ही नवीन चलन निर्मिती करुन , रोखे, ट्रेझरी बिले यावर कर्ज घेऊन भरुन काढली जाते. अर्थसंकल्पात मोठी तूट असल्यास चलनवाढीचा धोका निर्माण होतो. वस्तू व सेवांच्या किमती वाढतात. पैशाचे मूल्य घसरते. वस्तूंच्या वाढत्या किमती हया परत महागाई भत्त्यातील वाढीद्वारे चलनवाढीत परिणाम घडवून आणतात. अर्थसंकल्पातील तुटीचा विचार करता पुढील प्रकार पडतात.

**१. चालू उत्पन्नातील महसुली तूट**

**२. अर्थसंकल्पीय तूट**

**३. राजकोषीय तुट इ.**

विविध योजनावरील खर्च अनुदान, सहाय्य, सार्वजनिक उदयोगाची असमाधानकारक कामगिरी आयातीवरील वाढता खर्च इ. कारणे वाढत्या तुटीस जबाबदार आहेत.

अशा प्रकारे भारतातील प्रचलित आर्थिक समस्या सांगता येतील. पण देशाचा जर आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर या समस्यावर मात केली पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्यापासून आजपर्यंत या समस्या वाढतच चालल्या आहेत. सरकारने ठोस उपाययोजना करुन आर्थिक समस्यावर उपाय शोधले पाहिजेत. अन्यथा देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

## संदर्भ

१.श्रीधर देशपांडे , विनायक देशापांडे - भारतीय अर्थव्यवस्था हिमालय पब्लिशिंग हाऊस

२.के.एम. भोसले, के.बी. कटे - भारतीय अर्थव्यवस्था , फडके प्रकाशन कोल्हापूर

३.डॉ. सुभाष भेंडे - भारतातील अर्थव्यवस्था आणि भारताची लाकसंख्या, य.च.म.मु.वि. नाशिक

४.प्रा. रायखेलकर, दामजी भारतीय अर्थव्यवस्था , विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद